**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – पो.उप निरीक्षक प्रशांत शाहूराव भ–हाट,

वय – ५६ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

नेमणूक – उपविभागीय पोलीस अधिक्षक कार्यालय, शेवगाव.

**अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.के.साबळे यांच्यामार्फत सरतपास शपथेवर सुरु–**

१. दिनांक २६.११.२०१२ रोजी मी सोनई पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी मी, पो. ना. ताके, ए.पी.आय. पाटील व गाडी चालक असे ग्रामपंचायत निवडणूक असल्याने खरवंडी ते तामसवाडी या रस्त्याने पेट्रोलींग करत होतो. तेव्हा सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास खरवंडीच्या पुलाजवळ एक लाल रंगाचा ढंपर क्रमांक एम.एच. १२ ई.एफ. २२६६ असा येताना दिसला. आम्ही तो ढंपर थांबवून चालकालात्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव किशोर टिमकरे असे नाव सांगितले. तसेच, त्याने मालकाचे नाव दिलीप शिवाजी दुसुंगे असे सांगितले. त्या ढंपरमध्ये अडीच ब्रास वाळू होती. त्यास वाळूबाबत विचारणा केली असता त्याने ती वाळू भेरडापूर, ता. श्रीरामपूर येथून भरून तो नगर येथे घेवून जात आहे असे सांगितले. आम्ही चालकाला वाळू वाहतूकीचा परवाना व गाडीच्या कागदपत्रांची विचारणा केली असता त्याने परवाना व कागदपत्रे नसल्याचे सांगितले. सदरचा ढंपर पोलीस स्टेशनला घेवून आलो. पो.ना. ताके यांनी फिर्याद दिली. ढंपर चालकाला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी

माझा जबाब घेतला होता.

**सरतपास पुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**

(**श्रीमती.संध्या यु. सुळ**)

दिनांक–०९/०३/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.२, नेवासा